# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन खाते जी/उत्तर विभाग

## क्र.जी/उ/४९५३/स.अभि(घ.क.व्य)/एस.आर.दि.०२.०३.२०२४

## स्वारस्य अभिव्यक्ती

## जाहिरात

विषय :-जी/उत्तर विभागातील धारावी/माहिम प्रभागात रमजान सणानिमित्त साफ सफाईचे काम करण्यासाठी सामाजिक संस्थेकडून स्वयंसेवक घेण्यासाठी सोडत करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार जी/उत्तर विभागातील धारावी/माहिम प्रभागात रमजान सणानिमित्त साफ सफाईचे काम करण्यासाठी अशासकीय संस्थाचे स्वयंसेवक नेमणूक करण्यासाठी जी/उत्तर विभागातील स्थानिक अशासकीय नोंदणीकृत जसे मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, महिला बचत गट इ.यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर कामासाठी दि.०१.०१.२०२२ पूर्वी नोंदणी केलेल्या व सन २०२२-२०२३ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व किमान वेतनावर साफ-सफाईचा अनुभव असलेल्या संस्थांची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा कालावधी हा दि.११.०३.२०२४ ते १२.०४.२०२४ पर्यंत राहील.

तसेच अर्जाचा नमुना जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांच्या कार्यालयात रु.३००/- अधिक १८ टक्के जीएसटी असे रोख स्वरुपात(ना परतावा) व अनामत रक्कम रु.३०००/-(परतावा) या अटीवर दि. ०२.०३.२०२४ ते दि.०५.०३.२०२४ सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० यावेळेतच विकत मिळू शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/उत्तर योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उत्तर कार्यालयात घ.क.व्य. विभाग जी/उत्तर,पहिला मजला, रुम नं.३५ येथे संपर्क करावा. संस्थेने जी/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ०६.०३.२०२४ (दु.१२.०० वाजेपर्यंत) असेल. नमूद केलेल्या कार्यालयीन कालीवधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.)जी/उत्तर